नि.दि.दा. कं.१६/२०१४
सरस्वता/रविंद्र
**नि.८६** चे खाली

**उलटतपास वादीतर्फे वकील श्री ए.एम.नबीरा**

३. माझे शिक्षण ईयता १०वी पर्यंत झालेले आहे. दाव्यातील शेतजमीन ही आमच्या आजोबाची शेती आहे. माझे शपथपत्रातील परिच्छेद क्र.२ मधील मजकुर माझे आजोबा हे जिवंत असेपर्यंत त्या शेतजमीनीची वाहीजुपी करून त्यातुन उत्पन्न घेत होते हा मजकुर चुकीचा आहे. हे म्हणने खरे नाही की, मी माझे पुराव्याचे शपथपत्र वाचले नाही. माझे वडिल कधीपासुन शेती वहीती करीत होते हे मला माहीती नाही. माझे वडिल आजोबापासुन वेगळे कुठे राहत होते याचा उल्लेख मी माझया पुराव्याच्या शपथपत्रात केला नाही. माझया वडिलाला शेती करतेवेळेस कर्ज घेण्याची गरज भासली होती.

४. भुमापन क्र.१३, ३१ व ८४ वर या शेतावर २००७ मध्ये प्रत्येकी १,५०,०००/- रूपयाचे कर्ज घेतले होते. ते कर्ज आम्ही शेतीकरीता घेतले होते. हे म्हणने खरे आहे की, शेतावरील कर्ज परत फेडण्यासाठी मी माझया आत्याकडे शेती विकण्याच्या परवानगी घेण्यासाठी गेलो होतो. हे म्हणने खरे आहे की, शेतावरील कर्ज फेडण्यासाठी आम्ही २००७ मध्ये शेती सुनील ठाकरे याला विकली. माझी आत्या शिकलेली नाही. तिला लिहीता वाचता येत नाही.

५. माझे वडिल हयात असतांना मी शेती करत होतो. मी मागील ७-८ वर्षापासुन शेती करतो. माझया वडिलांनी आत्याला शेती घेवून दिल्याचे बरोबर आहे. त्याबद्दलचा दस्तऐवज मी दाव्यात दाखल केला नाही. वादीकडे १२ एकर शेती असल्याचा दस्त दाव्यासोबत जोडलेला नाही. आत्याकडे माझे हा खटला दाखल झाल्यापासुन माझे येणे जाणे

DISTRICT COURT NAGPUR

नाही. हे म्हणने खरे नाही की, वादीची तब्येत २-४ वर्षापासुन खराब आहे. वादीची आर्थीक परिस्थीती चांगली आहे. त्यांना पिक-पाणी चांगले होते. हे म्हणने खरे नाही की, वादीचे पती शिकलेले नाहीत. ते अंगठा करतात.

६. हक्कसोडण्याचा लेख व विक्रीपत्र नि.७५ व ७६ मी वाचलेला आहेत. हे म्हणने खरे नाही की, ते दोन्ही दस्त माझ्या सांगण्याप्रमाणे तयार केले. ते दोन्ही दस्त अर्जनविसाने तयार केले आहेत. अर्जनविस माझ्या ओळखीचे आहे. हे म्हणने खरे नाही की, हक्कसोडपत्रात वादीने हक्कसोडल्याबाबत नमुद नाही. हे म्हणने खरे नाही की, हक्कसोडण्याचा लेख फक्त आमच्या भावा बहीनीमध्ये झाला होता. हे म्हणने खरे नाही की, वादीचा गैरफायदा घेवून आम्ही त्यावर अंगठा घेतलेला आहे. हे म्हणने खरे नाही की, वादीने दावा शेताचा कधीही हक्क सोडलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, गट क्र.८४ खरेदी केला त्यावेळी माझे वडिल नाबालक होते. माझे वडिल वारले तेव्हा त्यांचे वय ५० होते. हे म्हणने खरे नाही की, गट क्र.८४ खरेदी करण्यासाठी माझ्या आजोबांनी पैसे दिले होते.

७. हक्कसोडण्याचा लेख दाव्यातील चारही शेताबद्दल केलेला आहे. आत्याला एक लाख रूपये दिल्याचे पुरावा मी दाव्यात दाखल केलेला नाही. आम्ही आपसी वाटणी केल्याबद्दल वादीला कळविले नाही. २०१३ मध्ये शेती विकल्याचे देखील वादीला कळविले नाही. दावा शेती मिहान प्रकल्पामध्ये जात असल्याबाबतचा पुरावा मी दाव्यात दाखल केलेला नाही. दाव्यामध्ये आवश्यक पार्टी जॉइन केली नाही म्हणुन दावा खारीज करावा

DISTRICT COURT NAGPUR

नि.दि.दा. कं.१६/२०१४
सरस्वता/रविंद्र
**नि.८६** चे खाली

असा मजकुर माझया वकिल साहेबांना सांगीतला होता. पार्टीचे नाव मला सांगता येत नाही. हे म्हणने खरे नाही की, वादीचा हिस्सा डावलण्यासाठी आम्ही खोटे हक्कसोडपत्र तयार केला. हे म्हणने खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास – काही नाही.

वा.दा.ब.आहे. श्रवणोत्तर स्विकृत

( डि.बी.गुट्टे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
कुही.

दिनांक १३/१२/२०१८

DISTRICT COURT NAGPUR

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of evidence are word to word, as per original evidence.

Name of Stenographer : Pravin T. Mandale